क्र. मुंमप्रविप्रा/बैठक/८५

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला समुह, वांद्रे (पूर्व),
मुंबई-४०० ०५१

दिनांक : १८ डिसेंबर, १९९८

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २८ नोव्हेंबर, १९९८ रोजी झालेल्या ८५ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास कृपया कळवाव्यात ही विनंती.

श्री. वि. आसगांवकर
१८/१२/९८

( श्री. वि. आसगांवकर )
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,

सर्व सदस्य,

निमंत्रित :

शासनाचे सचिव (२)
नगर विकास विभाग,
मंत्रालय.

प्रत अग्रेषित :

विधी सल्लागार,
मुं. म. प्र. वि. प्रा.

प्राधिकरणाचे अधिकारी

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
८५ व्या बैठकीचे कार्यवृत्त

---

**दिनांक** : २८ नोव्हेंबर, १९९६ (गुरुवार)

**वेळ** : सकाळी ११.०० वाजता

**सभास्थान** : मा. मुख्यमंत्री यांच्या कार्यालयातील
समिती कक्ष, ६वा मजला, मंत्रालय.

**उपस्थित सदस्य** :

| | |
|---|---|
| श्री. मनोहर जोशी<br>मा. मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| श्री. राज पुरोहित<br>गृहनिर्माण, कामगार व<br>सेवायोजन राज्यमंत्री | सदस्य |
| श्री. मिलिंद वैद्य<br>मुंबईचे महापौर | सदस्य |
| श्री. हरेश्वर पाटील<br>अध्यक्ष, स्थायी समिती<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री. वसंत डावखरे<br>विधान परिषद सदस्य | सदस्य |
| श्री दिनेश अफझुलपूरकर<br>शासनाचे मुख्य सचिव<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री. गिरीश गोखले<br>महापालिका आयुक्त<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री. जयंत देशपांडे<br>शासनाचे सचिव<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| श्री. के. नलिनाक्षन<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको व<br>शासनाचे प्रधान सचिव (नास्थासं)<br>नगरविकास विभाग | सदस्य |
| श्री. डी. टी. जोसेफ<br>महानगर आयुक्त | सदस्य-सचिव |

बैठकीच्या सुरुवातीला अध्यक्षांनी, श्री. देवव्रत मेहता यांची महानगर आयुक्त पदावरुन दिनांक २० नोव्हेंबर, १९९६ पासून बदली झाली आहे असे सांगून श्री. मेहता यांच्या काम करण्याच्या पध्दतीचा गौरवपूर्ण उल्लेख केला. त्यानंतर प्राधिकरणाने श्री. मेहता यांच्या सेवेची नोंद घेणारा खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ७०१ :

"श्री. देवव्रत मेहता यांनी या प्राधिकरणाचे सदस्य-सचिव आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त या नात्याने दिनांक २१.०७.१९९३ पासून दिनांक १९.११.१९९६ पर्यंत केलेल्या कार्याचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण गौरवपूर्ण उल्लेख करीत आहे. श्री. मेहता यांना त्यांचा भावी सेवा काळ उज्वलशील जावा अशी सदिच्छा हे प्राधिकरण व्यक्त करीत आहे."

त्यानंतर विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

बाब क्र. १ : प्राधिकरणाच्या मागील (८४ व्या) बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे.

कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

बाब क्र. २ : प्राधिकरणाच्या मागील (८४व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही.

प्राधिकरणाने कार्यवृत्तावरील कार्यवाहीची नोंद घेतली.

बाब क्र. ३ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात मुंबई नागरी परिवहन प्रकल्प-२ (एमयुटीपी-२) व मुंबई पुनर्वसाहत व पुनर्वसन प्रकल्प यासाठी अतिरिक्त कर्मचारी वृन्द निर्माण करणे.

या विषयावरील चर्चेच्या वेळी प्रस्तावीत केलेली पदे आवश्यक आहेत का याचा आढावा पुन्हा महानगर आयुक्तांनी घ्यावा असे अध्यक्षांनी सुचविले व त्यासापेक्ष

प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ७०२ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ११ (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या परिवहन व दळणवळण विभागात बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे पदे निर्माण करण्याच्या प्रस्तावास प्रस्ताविल्याप्रमाणे मान्यता देत आहे."

बाब क्र. ४ : महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४४ अनुसार विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे आलेल्या अर्जांवर विकास परवानगी आवेदन फी/ परिनिरिक्षण फी चालू करण्याचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करणे.

४.१ या विषयावरील चर्चेच्या वेळी, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कांही क्षेत्रांमध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून काम करते त्यामुळे विकास विषयक कामाचे प्रस्ताव या दोन्ही संस्थांकडे सादर केले जातात व त्यांचे परिनिरीक्षण दोन्ही संस्था करतात. अजूनपर्यंत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आवेदन फी / परिनिरीक्षण फी म्हणून काहीही आकारत नसे, पण प्रस्तावित ठरावाप्रमाणे अशा त-हेच्या विकास विषयक कामासाठी अशा त-हेची फी विकासकांना दोन्ही संस्थांना द्यावी लागू नये असे मत अध्यक्षांनी व्यक्त केले.

४.२ महानगर प्राधिकरणाने प्रस्तावित केलेली फी, ही जास्त नसल्यामुळे या बाबतची फी पूर्वीप्रमाणे बृहन्मुंबई महानगर पालिकेनेच आकारावी व त्याचा काही भाग मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास महानगर पालिकेने द्यावा अशी सूचना या संदर्भात करण्यात आली.

४.३ या सूचनेवर महानगर आयुक्त व महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी विचार करुन आकारलेली फी किती प्रमाणात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास देता येईल याचा अहवाल प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत द्यावा व तोपर्यंत या विषयावरील विचार लांबणीवर टाकण्यात यावा असे ठरले.

बाब क्र.५ : मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम यांना प्रस्तावित वीज उपकेंद्रासाठी सी. एस. क्र.८१ पैकी वडाळा, सिध्दार्थ नगर, रावळी जलाशय येथील जागा देणेबाबत.

---

विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.७०३ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे उपकलम (२) खाली प्रयोज्य असलेल्या शक्तीचा वापर करुन प्राधिकरण वडाळा येथील सी.एस.क्र.८१ पैकी ६८.७५ चौ.मी. जागा मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाकडे वीज उपकेंद्र उभारण्यासाठी खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून हस्तांतर करण्यास याद्वारे मंजूरी देत आहे :-

(१) वीज उपकेंद्रासाठी मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाला आवश्यक असलेल्या जमिनीची जी किंमत शासन प्राधिकरणाला आकारील ती अधिक हे प्राधिकरण संबंधित जमिनीच्या विकासासाठी, संरक्षणासाठी, कुंपण इत्यादीसाठी जो खर्च करील तो अधिक १५% वरकड खर्च या आधारे मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाला या जमिनीची किंमत आकारण्यात येईल,

(२) रुपांतरित उपकेंद्राकरिता वार्षिक भाडे आकार रु.१/-(रुपये एक फक्त) राहील,

(३) वीज उपकेंद्राचे भू-भाडे हे प्राधिकरण विहीत करील त्यादराने मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाने चुकते करणे आवश्यक राहील,

(४) वीज उपकेंद्रासाठी मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाला द्यावयाच्या जमिनीकरिता प्राधिकरण विहीत करील अशा भाडेपट्टा करारातील अटी व शर्ती लागू राहतील, आणि

(५) वीज उपकेंद्रासाठी द्यावयाच्या जमिनी संबंधीचे आरक्षण मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाने रद्द करुन द्यावयाचे आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, हा भूखंड मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाकडे हस्तांतरीत करणे आणि जमिनीच्या वाटपासाठी अधिमूल्य सूचित करणे या संदर्भातील उचित कार्यवाही करण्याकरिता महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाकडे हस्तांतरीत करावयाच्या जमिनीचा भाडेपट्टा करारनामा व भाडेपट्टा विलेख या मध्ये अनुरुप बदल करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे."

<u>बाब क्र.६</u> : द्रुत महामार्गाच्या आणि मुंबई महानगर प्रदेशातील मुख्य रस्त्यांच्या दर्जात वाढ करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला कर्ज देणे.

---

या विषयावरील चर्चेच्या वेळी खाली नमूद केलेले मुद्दे उपस्थित करण्यात आले व निर्णय घेण्यात आले :-

६.१ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने उपलब्ध असलेला निधी फक्त मुंबई महानगर प्रदेशातील पायाभुत सुविधांच्या विकासासाठी उपयोगात आणावा किंवा महाराष्ट्रातील इतर मागासलेल्या भागातील तशाच त-हेच्या विकास कामासाठीही त्याचा वापर करावा, तसेच अशा प्रकारच्या प्रकल्पासाठी लागणारा

निधी जर नाणे बाजारातून कर्जरुपाने किंवा "बांधकाम, परिचालन व हस्तांतरण" (BOT) वगैरे पध्दतीने उपलब्ध करणे शक्य असेल तर त्या प्रकल्पांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने आपल्या निधीतून कर्ज द्यावे का याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे जरुरीचे आहे असे अध्यक्षांनी सांगितले.

या मुद्दयावर आणखी चर्चा झाल्यावर प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेला निधी कोणत्या पायाभुत सुविधांसाठी प्राधिकरणाने उपलब्ध करुन द्यावा याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे शक्य व्हावे म्हणून या विषयावर सविस्तर टिप्पणी तयार करुन ती प्राधिकरणाच्या बैठकीसमोर ठेवावी म्हणजे त्यास राज्य शासनाची मंजूरी घेता येईल असे ठरले.

६.२ सार्वजनिक बांधकाम विभागास रु.२२५ कोटी पर्यंतचे कर्ज देण्याची प्राधिकरणाला शिफारस करतांना पूर्व द्रुतगती मार्ग व पश्चिम द्रुतगती मार्ग या वरील प्रत्येकी एक उड्डाण पूल बांधण्याचे काम सार्वजनिक विभागाच्या वतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने केले पाहिजे अशी एक अट कार्यकारी समितीने सूचविली होती त्याचा निर्देश करण्यात आला. ही अट मान्य करतांना संबंधीत दोन्ही उड्डाण पूलासाठी लागणारा सर्व खर्च सार्वजनिक बांधकाम विभागानेच करावयाचा आहे व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे ते काम सार्वजनिक बांधकाम विभागाचा प्रतिनिधी म्हणून करणार आहे असे कर्जाच्या अटी कळवितांना सार्वजनिक बांधकाम विभागास स्पष्ट करावे असे प्राधिकरणाने या बाबतीत ठरविले.

६.३ १९८५ सालानंतर अस्तित्वात आलेल्या परंतु दिनांक १.१.१९९५ च्या मतदार यादीत नावे असलेल्या व त्याच पत्यावर वास्तव्य करीत असलेल्या झोपडीवासीयांच्या झोपडया वगळता बाकी झोपडयांच्या निष्कासनाची कारवाई करण्याचे राज्य शासनाचे आदेश असल्यामुळे अशा झोपडया निष्कासीत करण्याची कारवाई वेळोवेळी झाली पाहिजे व त्या संबंधात काही अडथळे निर्माण झाल्यास ते संबंधीत अधिका-यांनी एकत्रितपणे विचार करुन सोडविले पाहिजेत, पण कुठल्याही

कारणासाठी अशा झोपडया निष्कासीत करण्याची कारवाई थांबणार नाही याची दक्षता संबंधीत संस्थांनी व अधिका-यांनी घेतली पाहिजे असे अध्यक्षांनी या बाबतीत पुन्हा एकदा सांगितले.

६.४ त्यानंतर विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ७०४ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ (१) (जी) आणि कलम २९-ए अनुसार मिळालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे, बाब टिप्पणीच्या परिच्छेद ३.१ मध्ये नमूद केलेली प्राधान्य क्रमाची कामे हाती घेण्यासाठी प्राधिकरणाच्या निधीमधून राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाला १२% व्याज दराने आणि खालील अटींच्या अधीन ३२५ कोटी रु. चे (तीनशे पंचवीस कोटी रु.) कर्ज देण्यास मान्यता देत आहे :-

(१) प्राधिकरणाच्या राखीव निधीतून दिल्या जाणा-या कर्जांना लागू असलेल्या अटी या कर्जाला सुध्दा लागू करण्यात येतील, आणि

(२) बाब टिप्पणीला जोडपत्र-दोन म्हणून जोडलेल्या कार्यकारी समितीच्या दिनांक १७ सप्टेंबर, १९९६ च्या ठराव क्र. ६८० मध्ये नमूद केलेल्या अटी या कार्यवृत्ताच्या प.६.२ मध्ये नमूद केलेल्या स्पष्टीकरणासह या कर्जाला लागू करण्यात येतील.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी, तसेच कराराच्या अटींमध्ये काही फेरबदल असल्यास त्यासह करार करुन घेण्यासाठी आणि हप्त्यांमध्ये कर्ज देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.७ : महानगर प्रदेश क्षेत्रातील ग्रामसुधार योजनांना सन १९९६-९७ मध्ये ठाणे जिल्हा परिषदेस अनुदान देणेबाबत.

---

विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.७०५ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, ठाणे जिल्हा परिषदेने सादर केलेल्या महापोली व कासणे या भिवंडी तालुक्यातील दोन गावांसाठी व हाजी मलंग वाडी या उल्हासनगर तालुक्यातील गावांमधील वरील टिप्पणीत नमूद केलेल्या कामांसाठी ग्रामसुधार योजनेच्या अंतर्गत एकूण रु. २१,४६,१३९ खर्चाच्या योजनांना प्राधिकरण, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाचे कलम २१ (अ) मधील तरतूदीनुसार मंजूरी प्रदान करीत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, सन १९९६-९७ च्या अंदाजपत्रकीय तरतूदींना अधीन राहून अनुदान वितरण करण्यास प्राधिकरण याद्वारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र.८ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ मध्ये सुधारणा - प्राधिकरणाने नेमलेल्या समितीचा अहवाल.

---

८.१ समितीने शिफारस केल्याप्रमाणे वाटपगृहींनी अधिमूल्याची रक्कम २ हप्त्यामध्ये भरल्यानंतर त्यांना संबंधीत भूखंडाचा भाडेपट्टा विलेख देण्याबाबतची सुधारणा अंमलात आणल्यास जरुर असलेला निधी वाटपगृहीस वित्तीय संस्था वेळीच उपलब्ध करु शकतील किंवा कसे या बद्दलची विचारणा काही वित्तीय संस्थांकडे करावी असे या विषयावरील चर्चेच्या वेळी सूचविण्यात आले व ते मान्य करण्यात आले.

८.२ त्यामुळे याबाबतीत पुढील विचार करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

बाब क्र. ९ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सन १९९५-९६ चा वार्षिक अहवाल.

प्राधिकरणाने मुं. म. प्र. वि. प्राधिकरणाचा सन १९९५-९६ सालचा प्रारुप वार्षिक अहवाल मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ७०६ :

" असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १९९५-९६ सालच्या वार्षिक अहवालाला हे प्राधिकरण मान्यता देत आहे. हा अहवाल राज्य शासनास सादर करण्यासाठी हे प्राधिकरण महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र. १० : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विविध विनियमांमध्ये 'बॉम्बे' नावाऐवजी 'मुंबई' हे नाव दाखल करण्याबाबत...

विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ७०७ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७५ चे कलम ५०, तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ व इतर सहाय्यभूत ठरणा-या शक्तींचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे बाब टिप्पणीसोबत जोडलेल्या जोडपत्रामध्ये नमूद केलेल्या विविध विनियमांमध्ये प्राधिकरणाचे नांव, निधी, महानगर प्रदेश व तत्सम इतर संबंधीत व अनुषंगीक बाबी संदर्भात 'बॉम्बे' या शब्दाऐवजी 'मुंबई' असा उल्लेख दाखल करण्यास याद्वारे मंजूरी देत आहे व जरुर त्या दुरुस्त्या करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र. ११ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कर्मचा-यांकरिता गट उपदान-नि-आयुर्विमा योजना.

---

विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ७०८ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंमप्रविप्रा अधिनियम, १९७४ चे कलम ११, पोटकलम (२) आणि उक्त अधिनियमाचे कलम ५० अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन आणि दिनांक २२ सप्टेंबर, १९८९ रोजीच्या आपल्या ठराव क्र. ४०४ अनुसार प्राधिकरण, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कर्मचा-यांच्या उपदान प्रदानावरील कमाल मर्यादा, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कर्मचारी गट उपदान-नि-आयुर्विमा योजनेनुसार दिनांक ०१-१०-१९९६ पासुन रु. १.०० लाखावरुन रु. २.५० लाखापर्यंत वाढविण्यास आणि प्रस्तावित केल्याप्रमाणे रु. १.०० लाखाहून अधिक उपदान मिळणा-या आणि दिनांक ०१.०४.१९९५ ते दिनांक ०१.१०.१९९६ दरम्यान सेवानिवृत्त झालेल्या केवळ एकाच कर्मचा-यास मुंबई महानगर प्रदेश विकास निधीतून फरकाची रक्कम देण्यास मंजूरी देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, या ठरावाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र. १२ : मुं.म.प्र.वि. प्राधिकरणामध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करण्याबाबत व त्याकरिता आस्थापना अधिका-याचे एक नवीन पद निर्माण करण्याबाबत.

---

विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ७०९ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे

कलम ११ चे पोटकलम (२) अन्वये केलेल्या शक्तींचा व याबाबत त्यास सहाय्यभूत असलेल्या इतर सर्व शक्तींचा वापर करुन हे प्राधिकरण खालील बाबीस शासनाची पूर्व मंजूरी मिळेल या गृहितकाच्या अधिन राहून आपली मंजूरी देत आहे:-

(१) प्रस्तावित केल्याप्रमाणे आस्थापना अधिकारी, अधिक्षक व सहाय्यक या पदांचा समावेश असलेला स्वतंत्र मागासवर्ग कक्ष स्थापन करणे,

(२) सदर मागासवर्ग कक्षासाठी रु.२२००-४००० या वेतनश्रेणीतील आस्थापना अधिकारी वर्ग-१ दर्जाचे एक पद निर्माण करणे, आणि

(३) मागासवर्ग कक्षातील आस्थापना अधिका-यास सहाय्य करण्यासाठी रु.१६४०-२९०० . या वेतनश्रेणीतील रिक्त असलेले 'मंडळ प्रमुख लिपीक' या पदाचे नामनिर्देशन 'अधिक्षक' म्हणून करणे.'

बाब क्र.१२ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना राज्य शासकीय कर्मचा-यांप्रमाणे तिसरी अंतरिम वाढ मंजूर करणे.

विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ७१० :

'असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ११(२)अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे शासनाने पूर्व मंजूरी दिलेली असल्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या कर्मचा-यांना मंजूर केलेली तिसरी अंतरिम वाढ शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेपुर/ १९९६/प्रक्र २१/सेवा-१०, दिनांक ४.१०.१९९६ मधील धर्तीवर प्राधिकरणातील कर्मचा-यांना दिनांक १.०४.१९९६ पासून मुळ वेतनाच्या १० टक्के परंतु कमीत कमी १०० रु. या दराने रोखीने.प्रदान करण्यास याद्वारे प्रस्ताविल्याप्रमाणे कार्योत्तर मंजूरी देत आहे.'

बाब क्र. १४ : वडाळा भारवाहक तळातील टप्पा १ व २ मधील मुलभूत सोयीं विकासाचा समन्वय साधण्यासाठी स्थापीत केलेल्या समितीवर महाराष्ट्र ट्रक ओनर्स असोसिएशनला प्रतिनिधीत्व देणे.

---

विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ७११ :

'असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरणाने त्याच्या ठराव क्रमांक ६७५, दिनांक ३०.५.१९९६ रोजीच्या ठरावान्वये वडाळा भारवाहक तळाच्या टप्पा १ व २ मधील मुलभूत सोयीच्या विकासाचा समन्वय साधण्यासाठी स्थापन केलेल्या समितीवर महाराष्ट्र ट्रक ओनर्स असोसिएशनचा एक प्रतिनिधी सदस्य म्हणून घेण्यास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.'

बाब क्र. १५ : पवई क्षेत्र विकास योजना - मे. मुकुंद लिमिटेड व श्री. अजय मोहन यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका-

---

या विषयावर विचार करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

बाब क्र. १६ : अतिरिक्त तळघराच्या क्षेत्रावर आकारल्या जाणा-या अधिमूल्याचा दर कमी करण्यासाठी 'मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्र विकास नियंत्रण विनियम, १९७९' मधील विनियम क्र.४ (ए)(एक) मध्ये फेरबदल.

---

विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ७१२ :

'असा ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४० (१) (सी) अनुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे

वांद्रे-कुर्ला संकुलाच्या अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून काम पहात असल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४० (३) तसेच कलम ३७ (१) अनुसार मिळालेल्या अधिकारांचा आणि याबाबत सहाय्यभुत ठरतील अशा इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे मंजूर झालेल्या "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे-कुर्ला अधिसुचित क्षेत्र विकास नियंत्रण विनियम, १९७९" च्या विनियम क्र.४ (अ) (एक) (इ) (तीन) यामध्ये फेरबदल करण्याच्या आणि जादा तळपर क्षेत्रासाठी आकारावयाच्या अधिमूल्याचे दर हे भाडेपट्टा अधिमूल्याच्या दराच्या ३०% वरुन ५% पर्यंत कमी करण्याच्या प्रस्तावाला मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ (एक) अनुसार मिळालेल्या अधिकारांचा आणि याबाबत सहाय्यभूत ठरतील अशा इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे शासकीय राजपत्रात आणि दोन स्थानिक वृत्तपत्रात एक नोटीस प्रसिध्द करण्यास आणि अशी नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत अशा फेरबदलाबाबत जनतेकडून सूचना आणि/ किंवा आक्षेप मागविण्यास मान्यता देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम,१९६६ च्या कलम १३९ अनुसार तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ ए अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण वर नमूद केलेल्या कलमानुसार नोटीस प्रसिध्द करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५१ (३) अनुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण महानगर आयुक्तांना किंवा महानगर आयुक्तांनी वरिष्ठ नियोजकाच्या

दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या नामनिर्देशित केलेल्या एका अधिका-याला याबाबत प्राप्त झालेले आक्षेप किंवा सूचना यावर विचार करण्यास आणि असे आक्षेप किंवा सूचना सादर करणा-या व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्राधिकरणाला एक अहवाल सादर करण्याचे आणि या अहवालासोबत, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ (१) अनुसार अंतिम मंजूरीसाठी कराव्या लागणा-या संस्कारासाठी प्रस्तावित फेरबदल सादर करण्याचे आदेश देत आहे.

"त्यापुढे आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, तळघराचे क्षेत्र मोजताना त्यामधून पटल भिंतीच्या क्षेत्राला वगळण्याच्या नव्या धोरणाला प्राधिकरण पुष्टी देत आहे आणि समन्यायाच्या प्रयोजनासाठी वांद्रे-कुर्ला संकुलाच्या अधिसूचित क्षेत्रातील भाडेपट्टादाराकडून पटल भिंतीच्या क्षेत्रासाठी अधिमूल्य म्हणून वसूल केलेली कोणतीही रक्कम व्याजाशिवाय परत करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

"त्यापुढे आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, या ठरावाच्या कार्यान्वयनासाठी आवश्यक त्या सर्व उपाय योजना करण्यास याद्वारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

***********